PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Majha chakula
Year: 1994

Song: Mee dombari adani
Lyricist: Pravin Davane

मैना
हैय्या
आहा
आहा
आहा आहा आहा
मी डोंबारी अडाणी मैना
करी मुंबईच्या राघूची दैना
मी डोंबारी अडाणी मैना
करी मुंबईच्या राघूची दैना
नार मी गोरी
पायाखाली दोरी
नार मी गोरी
माझ्या पायाखाली दोरी
तोल सावराया कुणीतरी या ना
आलो...
हैय्या

तुझा हळूच सावरीन तोल
माझ्या तालात मैने डोल
तूच सांभाळ पोरा तोल
तुझ्या नावानं वाजंल ढोल
डोलतील सारे
जरा खेल देखो प्यारे
अरे डोलतील सारे
जरा खेल देखो प्यारे
खुश होऊन पैका द्या ना
मी डोंबारी अडाणी मैना
करी मुंबईच्या राघूची दैना
मी डोंबारी अडाणी मैना
करी मुंबईच्या राघूची दैना

साऱ्या जगाची इकडं धाव
इथं मातीला सोन्याचा भाव
जो तो मांडून बसलाय डाव
कोण कळेना चोर न् साव
चकाकतं ते नसतं सोनं हां
अरे चकाकतं ते नसतं सोनं
जरा समजून पाव्हणं घ्या ना
मी डोंबारी अडाणी मैना
करी मुंबईच्या राघूची दैना
मी डोंबारी अडाणी मैना
करी मुंबईच्या राघूची दैना

आहा
आहा
आहा आहा आहा
ही गावराण मधाळ ज्वानी
रसरसली आग तुफानी
भल्याभल्यांना पाजंल पाणी
अशी डसंल मस्त जवानी
बसंल झटका
जरा बाजूला सटका हां
अहो बसंल झटका
जरा बाजूला सटका
ही न्यारीच बिजली नाना
मी डोंबारी अडाणी मैना
करी मुंबईच्या राघूची दैना
मी डोंबारी अडाणी मैना
करी मुंबईच्या राघूची दैना

किती जीवांची मुंबई आई

PlanetRead

Literacy for a Billion

हळू मायेचं पांघरूण देई
दोन वक्ताला खायाला देई
अशी जगात नगरी नाही
कसरत करती सारेच येथं हां
अहो कसरत करती सारेच येथं
खेळ जीवाशी होतो बघा ना
मी डोंबारी अडाणी मैना
करी मुंबईच्या राघूची दैना हा

मी डोंबारी अडाणी मैना
करी मुंबईच्या राघूची दैना
नार मी गोरी
माझ्या पायाखाली दोरी
तोल सावराया कुणीतरी या ना
आलो...

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*